तपस्वी चॅरिटेबल ट्रस्ट, येवती संचलित

## व्यंकटेश महाजन महाविद्यालय, उस्मानाबाद

समाजशास्त्र विभाग

# ''उस्मानाबाद तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाचे सर्वेक्षण''

(लघुप्रकल्प अहवाल)

शैक्षणिक वर्ष – २०१९-२०२०



# प्राचार्यांचा संदेश

आमच्या महाविद्यालयातील कला शाखेतील सर्व अध्यापकांनी विद्यार्थ्यांना सोबत घेऊन उस्मानाबाद तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाशी प्रत्यक्ष संवाद केला तसेच औपचारीक सर्वेक्षण केले. मागील तीन वर्षात उस्मानाबाद तालुक्यात ज्या शेतकरी आत्महत्या झाल्या आहेत, त्याची कारणे व स्वरूप लक्षात येण्यास मदत झाली. आत्महत्येच्या नंतर संबंधित कुटुंबाची सद्यःस्थिती काय आहे? अशा कुटुंबाला शासकीय आणि अन्य मदत झाली का? हे जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला.

एकूण ३० आत्महत्याग्रस्त कुटुंबाची निवड सर्वेक्षणासाठी करण्यात आली होती. शासनाने/प्रशासनाने वैध ठरलेल्या आत्महत्यांना प्राध्यान्य देण्यात आले. ३० पैकी ०५ कुटुंबे अशी आहेत की, ज्यांना आजही मोठ्या सहकार्याची गरज आहे. बहुतेक आत्महत्यांना कर्जबाजारीपणा जबाबदार आहे. यापुढे आम्ही या ०५ कुटुंबावर लक्ष केंद्रित करून त्यांना विविध यंत्रणांकडून मदत मिळवून देण्याचा प्रयत्न करणार आहोत.

संबंधित लघु प्रकल्पासाठी समाजशास्त्र विभागाने पुढाकार घेतला तसेच कला शाखेतील सर्व अध्यापक आणि विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सर्वांचेच मनःपूर्वक अभिनंदन!

asalunke
प्राचार्य

PRINCIPAL
Venkatesh Mahajan Senior College,
Osmanabad 413501

## लघुप्रकल्प समन्वयकाचे मनोगत

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या बहि:शाल शिक्षण मंडळाच्या वतीने व्यंकटेश महाजन महाविद्यालयास शेतकऱ्यांच्या आत्महत्येबाबत एकदिवशीय चर्चासत्र घेण्याचे सुचित करण्यात आले. त्यासाठी या विभागाने २५,०००/- रु. चा निधी देखील मंजूर केला. प्रत्यक्ष चर्चासत्र घेण्यापूर्वी उस्मानाबाद तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांची भेट घेऊन वास्तव स्थिती आणि सद्य:स्थिती जाणून घेण्यासाठी लघु प्रकल्प करण्याचे ठरले. महाविद्यालय प्रशासनाने या लघुप्रकल्पासाठी ५०००/- (पाच हजार रु.) चा निधी मंजूर केला. महाविद्यालयाच्या समाजशास्त्र आणि राज्यशास्त्र विभागाने पुढाकार घेतला आणि संबंधित लघु प्रकल्प पूर्ण केला.

सुरूवातीला आम्ही तहसील कार्यालयातून आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाची यादी घेतली. २०१७, २०१८ आणि २०१९ मधील शेतकरी आत्महत्यांची यादी प्राप्त झाली. यातील वैध प्रकरणांना प्राधान्य देत आम्ही एकूण ३० आत्महत्याग्रस्त कुटुंबांवर लक्ष केंद्रित केले. महाविद्यालयाच्या कला विभागातील सर्व अध्यापकांनी मोलाचा सहभाग दिला. एक प्रश्नावली तयार करून प्रत्यक्ष मुलाखती घेण्याचे निश्चित झाले. काही विद्यार्थ्यांना सोबत घेऊन आम्ही संबंधित कुटुंबाशी संवाद केला व प्रत्यक्ष परिस्थिती लक्षात घेतली. एकूण ३० कुटुंबापैकी २६ कुटुंबांची प्रत्यक्ष भेट झाली. बहुतेक आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत दयनीय आहे. संबंधित शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना देखील हालाखीची आर्थिक परिस्थितीच जबाबदार असल्याचे जाणवते.

२६ पैकी ०५ कुटुंबे मात्र अत्यंत हलाखीचे जीवन जगताना दिसले. विविध सेवाभावी संस्था, संघटना याबाबतीत मदत करू शकतील त्यांना उभारी देण्याचे काम झाले तरच हा लघुप्रकल्प फलदायी झाला असे म्हणता येईल. आमचे मा.संस्था प्रतिनिधी, मा.प्राचार्या, सर्व प्राध्यापक, विद्यार्थी यांचे अनमोल मार्गदर्शन व सहकार्य लाभले, सर्वांचे आभार!

**प्रा.अशोक गोरे**

**समाजशास्त्र विभागप्रमुख**

Head
Department Of Sociology
Venkatesh Mahajan Sr.College
Osmanabad

## लघुप्रकल्पाचे निष्कर्ष :-

Conclusion

१) आत्महत्या केलेले बहुतेक शेतकरी पुरूष वर्गातील आहेत.

२) आत्महत्या केलेल्या बहुतेक शेतकऱ्यांचे वय ५० च्या आत आहे.

३) एकूण ३० पैकी ०४ स्त्रियांनी आत्महत्या केल्या आहेत.

४) कर्जबाजारीपणा हे आत्महत्यांचे मोठे कारण आहे.

५) सततचा दुष्काळ, नापिकी आणि आजारपण हे देखील मोठे कारण.

६) प्रशासनाने आतमहत्याग्रस्त कुटुंबियांना एक लाख रु. ची मदत दिली.

७) अन्य कोणीही मदत केलेली नाही.

८) बहुतेक आत्महत्या करणारे शेतकरी घरातील कर्ते पुरूष आहेत.

९) सद्यःस्थितीत देखील कर्जाचे ओझे कायम आहे.

१०) अनेक कुटुंबांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे.

११) शेतमजुरी हा काही कुटुंबांच्या उदरनिर्वाचे साधन आहे.

१२) काही कुटुंबांनी परिस्थितीला कंटाळून स्थलांतर केले आहे.

१३) आत्महत्याग्रस्त काही शेतकरी कुटुंबात मुलांच्या शिक्षणावर प्रतिकूल परिणाम झाला आहे.

१४) बहुतेक कुटुंबात ०५ पेक्षा जास्त सदस्य आहेत.

१५) बहुतेक शेतकऱ्यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली आहे.

## शिफारशी :-

१) आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाचे सद्यःस्थितीबाबत प्रशासनाने व्यापक सर्वेक्षण करावे.

२) आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना कर्जमाफी द्यावी.

३) शासकीय मदतीची रक्कम वाढविणे आवश्यक वाटते.

४) वेळोवेळी कुटुंबाचे समुपदेशन करावे.

५) अन्य स्वयंसेवी संस्थांनी मदत करावी.

६) आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांच्या पाल्यांना मोफत शिक्षण द्यावे.

७) रोजगार/नोकरीच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

Gore A. R.
समन्वयक
Head
Department Of Sociology
Venkatesh Mahajan Sr.College
Osmanabad

वेंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय कार्यालय उस्मानाबाद

PRINCIPAL
Venkatesh Mahajan Senior College,
Osmanabad 413501

# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांची यादी व विवरण

| अ.क्र. | मयत शेतकऱ्याचे नाव | गाव | वय | आत्महत्येचा दिनांक | मदत वाटप |
|---|---|---|---|---|---|
| १ | कल्याण वडजू गायके | उस्मानाबाद | ४६ | ०२/०१/२०१९ | १,००,०००/- |
| २ | आकाश सोमनाथ बनसोडे | कनगरा | २० | १९/०३/२०१९ | १,००,०००/- |
| ३ | प्रकाश भारत जाधव | बावी | ३८ | ०२/०४/२०१९ | १,००,०००/- |
| ४ | दिलीप शंकर ढवळे | क.तडवळा | ६० | १२/०४/२०१९ | १,००,०००/- |
| ५ | प्रदिप प्रकाश पाटील | सांजा | ४१ | २४/०६/२०१९ | १,००,०००/- |
| ६ | श्रीहरी निवृत्ती भोईटे | कोंबडवाडी | ६० | १६/०७/२०१९ | १,००,०००/- |
| ७ | विजय महादेव जाधव | जवळा दु. | २३ | २५/०७/२०१९ | १,००,०००/- |
| ८ | दत्तात्रय अर्जुन देशमाने | कौडगाव | ३५ | ०४/०२/२०१८ | १,००,०००/- |
| ९ | नवनाथ हरी कुदळे | सारोळा बु. | ५८ | ०९/०३/२०१८ | १,००,०००/- |
| १० | जनक बबन क्षीरसागर | नितळी | २२ | ०३/०५/२०१८ | १,००,०००/- |
| ११ | गणपती त्रिंबक वाकुरे | ढोकी | ४७ | १९/०६/२०१८ | १,००,०००/- |
| १२ | दादासाहेब ज्ञानदेव पारवे | बरमगाव बु. | ४५ | २९/०६/२०१८ | १,००,०००/- |
| १३ | सुखेदव भगवान गायकवाड | जुनोनी | ७० | १०/०८/२०१८ | १,००,०००/- |
| १४ | अंकुश दत्तू पसारे | पाडोळी | ३८ | ०२/११/२०१८ | १,००,०००/- |
| १५ | धनाजी दगडू बुर्ले | सुंभा | ३२ | ३०/१२/२०१८ | १,००,०००/- |
| १६ | केशरबाई अरुण हांडे | भानसगाव | ६० | ०५/०१/२०१७ | १,००,०००/- |
| १७ | रेणुकादास माणिक कुलकर्णी | वरुडा | ४० | १९/०१/२०१७ | १,००,०००/- |
| १८ | प्रभावती गोरख माळी | करजखेडा | ५५ | २४/०२/२०१७ | १,००,०००/- |
| १९ | प्रभाकर अंबादास शिंदे | सांगवी | ५५ | १९/०२/२०१७ | १,००,०००/- |
| २० | सुजित गणपती पाटील | वाघोली | ३७ | ०३/०३/२०१७ | १,००,०००/- |
| २१ | संदिपान बळीराम शिंदे | भंडारी | ५८ | ०४/०३/२०१७ | १,००,०००/- |
| २२ | वसंत भगवान पवार | धारुर | ६५ | ०९/०३/२०१७ | १,००,०००/- |
| २३ | लिंबराज गोरोबा दाणे | बेंबळी | ४९ | २५/०३/२०१७ | १,००,०००/- |
| २४ | दादासाहेब संभाजी तनमोर | भि.सारोळा | ५६ | ३०/०३/२०१७ | १,००,०००/- |
| २५ | दत्तात्रय लक्ष्मण घोगरे | राजुरी | ४५ | ०४/०४/२०१७ | १,००,०००/- |
| २६ | तानाजी किसन भागुडे | मोहतरवाडी | ४६ | २०/०३/२०१७ | १,००,०००/- |
| २७ | सोमनाथ लिंबराज गाढवे | धुत्ता | ३३ | १२/०४/२०१७ | १,००,०००/- |
| २८ | गोरख दादाराव गवाड | खेड | ५५ | १६/०४/२०१७ | १,००,०००/- |
| २९ | काशीनाथ मंजू चव्हाण | आंबेजवळगे | ३५ | २१/०४/२०१७ | १,००,०००/- |
| ३० | मिराबाई हनुमंत कदम | काजळा | ५८ | २४/०५/२०१७ | १,००,०००/- |

Head
Department Of Sociology
Venkatesh Mahajan Sr.College
Osmanabad

तपस्वी पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, येवती संचलित

## व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, उस्मानाबाद

## समाजशास्त्र विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१९—२०२०

**प्रकल्प**

**"उस्मानाबाद तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाचे आर्थिक व सामाजिक सर्वेक्षण"**

## प्रत्यक्ष मुलाखत : एक अनुभव

आमच्या महाविद्यालयाच्यावतीने उस्मानाबाद तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाचे आर्थिक व सामाजिक सर्वेक्षण करण्याचे ठरविले असता, हिंदी विभागातील शिक्षक डॉ. विनोदकुमार विलासराव वायचळ व डॉ. संजय व्यंकटराव जोशी यांचेकडे सांगवी, नितळी आणि भिकार सारोळा या तीन गावांतील क्रमश: आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटूबांला प्रत्यक्ष भेटण्याची एक संधी मिळाली. याभेटी मधून जी निरीक्षणे आमच्या समोर आली, त्यांची तथ्यपरक मांडणी करीत आहोत.

**१) मयत स्व. प्रभाकर अंबादास शिंदे (सांगवी) :—**

आम्ही दोघे ही सर्वप्रथम सांगवी, ता. जि. उस्मानाबाद येथे गेलो. गावातील जागरूक लोकांच्या मदतीने आम्ही येथील आत्महत्या केलेल्या स्व. प्रभाकर अंबादास शिंदे यांचे घरी गेलो. घर अतिशय छोटेखानी तसेच कच्च्या बांधकामाचे होते. घरासमोरील गोठ्यासारख्या आंगणात आम्ही थांबलो. घरामध्ये मृत व्यक्तिच्या विहीण बाई होत्या. त्यांना आमच्या येण्याचे कारण सांगताच त्यांनी आपल्या मुलीला म्हणजेच मयत प्रभाकर शिंदे यांच्या सुनेला बोलावण्यासाठी गल्लीतील एक मुलाला पाठविले. थोड्या वेळाने ती महिला म्हणजेच सौ.

गोदावरी मोहन शिंदे या आल्या. त्या खरे तर दूरून पाणी आणून भरत होत्या. त्यांच्याशी बोलल्यानंतर संपूर्ण परिस्थिती समजली.

मयत प्रभाकर अंबादास शिंदे वय ६५ यांनी दि. १९ फेब्रूवारी २०१७ रोजी किटकनाशक औषधाचे प्राशन करून आपले जीवन संपविले होते. त्यांच्या पश्चात् पत्नी गं. भा. अंजना प्रभाकर शिंदे वय ६५ वर्षे, दोन मुले, दोन सुना व नातवंडे असे कुटुंब आहे. श्री. मोहन प्रभाकर शिंदे (वय ३०, शिक्षण १२ वी) व श्री. जीवन प्रभाकर शिंदे (वय २७, शिक्षण ८ वी) हे दोघे ही वाहनचालकाचे (ड्रायव्हर) काम करतात. वडिल शेतमजूर होते. त्यामुळे कुठल्याही प्रकारची शेती नाही. सौ. गोदावरी मोहन शिंदे (वय २५, शिक्षण १२ वी) या सांगवी येथे राहून घरकाम करतात. त्यांची मुलगी कु. गौरी मोहन शिंदे ही चार वर्षांची असून आंगणवाडीमध्ये शिकण्यास जाते. तर मुलगा कार्तिक मोहन शिंदे हा केवळ एक वर्षाचा आहे. मोहन हा ड्रायव्हर असल्यामुळे घरी फारच कमी वेळ असतो.

मयत प्रभाकर शिंदे यांचा दूसरा मुलगा श्री. जीवन प्रभाकर शिंदे हा सुद्धा ड्रायव्हर आहे. हा उस्मानाबाद येथे स्थायिक झाला आहे. जीवन यांची पत्नी सौ. कोमल जीवन शिंदे (वय २५, शिक्षण १० वी) उस्मानाबाद येथेच राहते. त्यांचा मुलगा स्वराज जीवन शिंदे हा तीन वर्षांचा असून आंगणवाडीमध्ये शिकत आहे.

सौ. गोदावरी मोहन शिंदे यांच्या म्हणन्यानुसार कुठलीही आर्थिक स्वरूपाची मदत अद्याप मिळाली नाही. आर्थिक गोष्टींबाबत त्यांना माहिती नाही. त्यांचेकडून श्री. मोहन प्रभाकर शिंदे यांचा संपर्क क्रमांक ८७६६५५१३१५ घेऊन आम्ही पुढील गावी निघालो.

**२) मयत स्व. जनक बबन क्षिरसागर (नितळी) :–**

त्यानंतर आम्ही नितळी येथील आत्महत्याग्रस्त कुटूंबाच्या भेटीसाठी निघालो. नितळी येथे पोचल्यानंतर एका प्रौढ व्यक्तिने आम्हाला मयत जनक बबन क्षिरसागर यांचे घर दाखविले. घर चांगले बांधकाम केलेले होते. मयत जनक याची आई सौ. दमयंती बबन क्षिरसागर व त्यांचे एक नातेवाईक घरी होते. कदाचित ते जनकचे आजेमामा असतील. या नातेवाईकाने व सौ. दमयंतीनी बरीच माहिती सांगितली. मयत जनक बबन शिंदे हा केवळ २३ वर्षे वयाचा व ८ वी पर्यंत शिक्षित एकुलता एक मुलगा होता. तो सर्वप्रथम ड्रायव्हिंग शिकला.

उस्मानाबाद ते पुणे अशी मोटार चालवू लागला. उत्पन्न बऱ्यापैकी चालू होते. उत्साहाने चांगल्या प्रतीचे घर बांधले. दोन बहिणींचा विवाह करून दिला. परंतू घराचे बांधकाम व बहिणींच्या लग्नासाठी अमाप कर्ज काढावे लागले. तशातच पुणे येथील एका मोटार डिलर कडून सामानाची ने—आण करणारी गाडी विकत घेतली. गाडीसाठी (आयशर टेम्पो) ही कर्ज काढावे लागले. यासाठी एक एकर जमीन ही विकावी लागली होती.

गाडीचे पैसे चुकते केल्यानंतर ही गाडीचा डिलर गाडीची कागदपत्रे देत नव्हता म्हणून गाडीची मालकी ही मिळत नव्हती. यामुळे जनक निराश झाला होता. एक लग्नाच्या प्रसंगी सर्वजण दूसऱ्या गावी गेले होते. ऐन धामधुमीत तो जेवणावळ चालू असतानाच शीत पेय आणण्यासाठी म्हणून निघून गेला. लग्नानंतर बरीच शोधाशोध केल्यानंतर ही सापडला नाही. कांही वेळाने कुटूंबियांना कळाले की गावाबाहेरील वावरात जनकने एका झाडाला गळफास घेऊन आत्महत्या (दि. ३ मे २०१८) केली आहे. जनकचे लग्न झाले नव्हते.

जनकच्या पश्चात् वडील श्री. बबन विष्णू क्षिरसागर (वय ५५, अशिक्षित), आई सौ. दमयंती बबन क्षिरसागर (वय ५०, ६ वी) तसेच बहीण सौ. रेखा हनुमंत जाधव (विवाहित, वय ३०, ७ वी शिक्षित) आपल्या सासरी दारफळ येथे राहते.दूसरी बहीण सौ. मीरा संतोष वीर (विवाहित, वय २८, ४ थी शिक्षित) ही देखील आपल्या सासरी आळणी येथे राहते.

आर्थिक दृष्ट्या सरकारी मदत एक लाख रूपयांच्या स्वरूपात मिळाली आहे. परंतू कर्ज वाढतच चालते आहे. महिला बचत गट, खाजगी, ढोकी येथील शेतकरी बँक व पुणे येथील अनेक लोकांचे कर्ज मोठ्या प्रमाणावर अंदाजे २ लाखचे आहे. संपर्क क्रमांक ७५१७६२९९७१ हा आहे.

**३) मयत स्व. दादासाहेब संभाजी तनमोर (भिकार सारोळा) :—**

भिकार सारोळा या गावातील प्रौढ व्यक्तिकडून मयत दादासाहेब संभाजी तनमोर यांच्या घराचा पत्ता मिळवून आम्ही त्यांच्या घरी पोचलो. त्यांचे घरी मयत दादासाहेबांची पत्नी गं. भा. आवडाबाई दादासाहेब तनमोर (वय ५५ वर्षे, अशिक्षित) मुलगा श्री. सर्जेराव दादासाहेब तनमोर (वय ३६, १० वी), सून सौ. बालिका सर्जेराव तनमोर (वय ३०, ७ वी), मुलगा आण्णासाहेब दादासाहेब तनमोर (वय २८, १२ वी), सून सौ.

अंजली आण्णासाहेब तनमोर (वय २१, १२ वी), नातू श्री. कुणाल सर्जेराव तनमोर (वय १४, ७ वी), श्री. कुशाल सर्जेराव तनमोर (वय १२, ५ वी) व यशराज आण्णासाहेब तनमोर (वय २ वर्षे) हे भेटले.

घर अतिशय खराब स्थितीमध्ये होते. घर म्हणजे पत्र्याचे शेड आहे. ऊन–पाऊसापासून कोठले ही संरक्षण नाही. गं. भा. आवाडाबाईंशी चर्चा केल्यानंतर कळाले की, तनमोर यांची १२ एकर कोरडवाहू शेती आहे. ही शेती करण्यासाठी दादासाहेबांनी ट्रक्टर बँकेच्या कर्जाच्या आधारे विकत घेतले होते. परंतू नापीकी मुळे कर्ज फेडू शकले नाहीत. बँकेच्या दोन नोटिस आल्यानंतर हाय खाऊन किटकनाशक औषधाचं प्राशन करून २०१७ मध्ये आत्महत्या केली. सरकारी मदत तर मिळाली, परंतू अद्याप दोन लाखाचे कर्ज डोक्यावर आहे. अवर्षणामुळे कोरडवाहू शेती सुद्धा कोणत्या ही प्रकारचे उत्पन्न प्राप्त होत नाही. सद्या मजूरी करण्याशिवाय दूसरे उत्पन्नाचे साधन नाही. श्री. सर्जेराव तनमोर यांचा संपर्क क्रमांक ९७६३६६१४५५ असा आहे.

शिफारस :– आम्ही शिफारस करतो की, उपरोक्त तिन्हीं प्रकरणांमध्ये खरोखरच अत्यंत हालाखीची परिस्थिती असून, या मयत व्यक्तिंच्या परिवारावर कर्जाचे डोंगर चढले आहेत. या लोकांसाठी कांही निश्चित व कायम स्वरूपीची सहायता करण्याची आवश्यकता आहे.

प्रा. डॉ. संजय व्यंकटराव जोशी

सदस्य, हिंदी विभाग

व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय

उस्मानाबाद

प्रा. डॉ. विनोदकुमार विलासराव वायचळ

अध्यक्ष, हिंदी विभाग

व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय

उस्मानाबाद

तपस्वी पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, येवती संचलित
व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, उस्मानाबाद

**शैक्षणिक वर्ष २०१९-२०२०**

**प्रकल्प**

## ''उस्मानाबाद तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाचे आर्थिक व सामाजिक सर्वेक्षण''

## प्रत्यक्ष मुलाखत : एक अनुभव

दिनांक : २६/०९/२०१९

व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने आयोजित उस्मानाबाद तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाचे आर्थिक आणि सामाजिक सर्वेक्षण हा उपक्रम राबविण्यात आले. या अभियानाविषयी दि.२१/०९/२०१९ रोजी मी प्रा.डॉ.प्रशांत चौधरी आणि माझे सहकारी प्रा.डॉ.सहदेव रसाळ यांनी बरमगाव (बु.), भंडारी आणि करजखेडा या गावांना भेटी दिल्या. सदरील गावातील आपले विद्यार्थी नसल्यामुळे गावातील नागरीकांच्या सहकार्याने आत्महत्याग्रस्त कुटुंबाशी भेटी घेवून संवाद साधण्यात आला.

आमच्या संपर्कातील प्रथम गाव बरमगाव (बु) येथे भेट देण्यात आली. या गावातील दादासाहेब ज्ञानदेव पारवे या आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबाला गावातील नागरिकांच्या सहकार्याने भेट दिली. त्यांच्या कुटुंबात एकूण चार सदस्य असून लक्ष्मीबाई दादासाहेब पारवे या कुटुंबाची जबाबदारी सांभाळतात. त्यांच्या पतीने कर्जबाजारीपणामुळे विषारी औषध पिऊन २९ जून २०१८ रोजी आत्महत्या केली आहे. त्यांच्यावर युनियन बँकेचे ८० हजाराचे व सोसायटीचे ४० हजाराचे कर्ज होते. त्यांच्या कुटुंबाला शासकीय मदत ७० हजार मिळालेली आहे. पावणे तीन एकर एवढी जमीन असून शेती अन्य शेतात त्यांचे कुटुंबिय मजूरी करतात. त्यांचे घर साधे व कच्चे आहे. सध्या ९० हजार एवढे कर्ज त्यांच्या कुटुंबावर आहे. एका मुलीचा विवाह झला असून एक मुलगी अविवाहीत आहे. मुलाचे शिक्षण आर्थिक स्थिती बिकट असल्यामुळे थांबलेले आहे. या कुटुंबाला आर्थिक मदतीची गरज आहे.

संदिपान बळीराम शिंदे या आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला भंडारी येथे जाऊन भेट देण्यात आली. या कुटुंबाचे कुटुंबप्रमुख धनराज संदिपान शिंदे हे आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचे सुपुत्र असून या कुटुंबातील एकूण सदस्य संख्या पाच आहे. त्यांच्याकडे २ एकर बागायती जमीन शेती आहे. व्यवसाय या कुटुंबाचे प्रमुख धनराज शिंदे करतात. त्यांचे छोटे भाऊ लिंबराज संदिपान शिंदे हे आळंदी येथे पेट्रोल पंपावर नोकरी करतात. त्यांचे घर आर.सी.सी. व पक्के आहे. या कुटुंबातील संदिपान बळीराम शिंदे यांनी घरातील वैयक्तिक कारणांमुळे आत्महत्या केली. त्यांनी आपल्या शेतातील झाडाला गळफास लावून दि.४ मार्च २०१७ आत्महत्या केली. या कुटुंबाला आर्थिक मदतीची आवश्यकता वाटत नाही.

आमच्या संपर्क अभियानातील तिसरे कुटुंब प्रभावती गोरख माळी, करजखेडा या गावास भेट दिली. हे कुटुंब सदर गावी राहत नाही, ते पुणे येथे स्थलांतरीत झाले आहे. त्यांच्या कुटुंबाविषयीची माहिती आत्महत्याग्रस्त व्यक्तीच्या पुतण्याकडून घेण्यात आली. या व्यक्तीची शेती राष्ट्रीय महामार्गात गेल्यामूळे १ कोटी १२ लाख उपलब्ध झालेले आहेत. त्यामुळे त्यांनी गाव सोडले असल्याची माहिती मिळाली. आत्महत्येचे मूळ कारण समजू शकले नाही. या कुटुंबाला आर्थिक मदतीची आवश्यकता वाटत नाही.

या आत्महत्याग्रत शेतकरी कुटुंबाचे आर्थिक व सामाजिक सर्वेक्षण करत असताना आमच्याकडे एकूण तीन कुटुंबाची जबाबदारी होती. या तीनपैकी दोन कुटुंबे आर्थिकदृष्ट्या संपन्न दिसून आली. त्यांच्या आत्महत्येचे कारण कर्जबाजारीपणा वाटला नाही. एक कुटुंब आर्थिकदृष्ट्या दुर्बल वाटले. सबब अहवाल स्वीकार करावा, ही विनंती.

**प्रा.डॉ.सहदेव रसाळ**
**सहाय्यक प्राध्यापक**
**मराठी विभाग**

**प्रा.डॉ.प्रशांत चौधरी**
**सहयोगी प्राध्यापक**
**व विभाग प्रमुख**

तपस्वी पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, येवती संचलित
व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, उस्मानाबाद

**शैक्षणिक वर्ष २०१९-२०२०**

**प्रकल्प**

### ''उस्मानाबाद तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाचे आर्थिक व सामाजिक सर्वेक्षण''

## प्रत्यक्ष मुलाखत : एक अनुभव

व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने राबविण्यात आलेल्या उस्मानाबाद तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयांशी दिनांक १५/०९/२०१९ रोजी संवाद केला. मी दिनकर सुदामराव रासवे आणि माझे सहकारी डॉ.महादेव माणिकराव हारगे यांनी तसेच गावातील काही विद्यार्थ्यांना सोबत घेवून तीन गावातील काही विद्यार्थ्यांना सोबत घेवून तीन गावातील शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबाच्या घरी जावून संवाद साधला.

सर्व प्रथम दिनेश लिंबराज डावकरे (दाणे) राहणार बेंबळी यांच्या घरी गेलो. त्यांच्या घरी एकुण ६ सदस्य आहेत. पैकी २ मुले शेतीत काम करतात. केवळ २ हेक्टर शेती असल्यामुळे उत्पन्न कमी आहे. शिवाय ट्रॅक्टर घेण्यासाठी ४ लाख रुपये कर्ज आणि आयसीआयसीआय बँकेचे २.५ लाख कर्ज वेळेवर फेडता न आल्यामुळे आर्थिक विवंचनेला कंटाळून गळफास घेवून आपली जीवनयात्रा संपवीली. या कुटूंबाचे सध्या सततच्या नापिकीमुळे उत्पन्न घटल्यामुळे आर्थिक विवंचनेत वाढ झाली आहे. त्यामुळे कर्जाचे हप्तेफेड या भितीमुळे लिंबराज गोरोबा डावकरे (दाणे) या शेतकऱ्याने २५/०३/२०१७ रोजी आत्महत्या केली.

दुसरे कुटुंब म्हणजे सोमनाथ गेंदा बनसोडे राहणार कनगरा यांच्या घरी भेट दिली. या कुटुंबाचे घर साधे पत्र्याचे असून शेती दीड एकर आहे. वार्षिक उत्पन्न ४० हजार रुपये आहे. घरात एकुण चार सदस्य आहेत. सोसायटी आणि बँकांचे कर्ज असल्यामुळे तसेच शेतीच्या नापिकीमुळे शेतकरी आकाश सोमनाथ बनसोडे वय २७ वर्षे यांनी विष प्राशन करून आत्महत्या केली.

तिसरे आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंब म्हणजे सोमनाथ लिंबराज गाढवे यांचे होय. शेती दीड एकर घर शेतात पत्र्याचे शेड आहे. त्यातच ते राहतात. घराचे उत्पन्न अत्यंत कमी असून संयुक्त कुटुंब पध्दती

आहे. घरामध्ये एकुण सात सदस्य आहेत. उत्पन्नाचे साधन केवळ शेती असल्यामुळे कुटुंबाची उपजीवीका भागविणे कठीण जात होते. त्यामुळे त्यांनी बँकांचे कर्ज घेतले होते आणि ते फेडणे अशक्य झाल्यामुळे सोमनाथ लिंबराज गाढवे वय ३५ वर्षे यांनी एप्रिल २०१७ मध्ये गळफास घेवून आत्महत्या केली.

एकंदीत तिन्ही आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटूंबाशी झालेल्या संवादामधून असे दिसून आले की, उत्पन्न कमी आणि कर्जाचा डोंगर जास्त या कारणामुळे शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहे, असे निदर्शनास आले.

**प्रा.रासवे डी.एस.**
**सहाय्यक प्राध्यापक**
**राज्यशास्त्र विभाग**

**प्रा.डॉ.हारगे एम.एम.**
**सहाय्यक प्राध्यापक**
**राज्यशास्त्र विभाग**

तपस्वी पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, येवती संचलित
व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, उस्मानाबाद
**शैक्षणिक वर्ष २०१९-२०२०**
**प्रकल्प**

## "उस्मानाबाद तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाचे आर्थिक व सामाजिक सर्वेक्षण"

## प्रत्यक्ष मुलाखत : एक अनुभव

उस्मानाबाद तालुक्यातील 'बावी' व 'धारूर' या दोन खेड्यातील शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबाला भेट दिली. मी व स्वामी समर्थ कला, विज्ञान, महाविद्यालयाचे प्राचार्य श्री.संतोष कपाळे यांच्यासह तसेच श्री.प्रवीण मूळे यासह भेट दिली. प्रथमदर्शनी चित्र बघितल्यावर धारुर येथील श्री रामकिसन वसंत पवार यांची परिस्थिती खूपच बिकट दिसली. पवार यांच्या वडिलानी (पवार वसंत भगवान) यांनी २०१७ साली गळफास घेवून आत्महत्या केली. त्यांच्या पत्नीच्या आजारपणसाठी व शेतीसाठी त्यांनी बँकेतून कर्ज घेतले होते. सततचा दूष्काळ व नापिकी यामूळे त्यांनी आत्महत्या केली. वसंत पवार यांना दोन मुले आहेत. सद्यःस्थितीत दोन्ही मुले वेगळी राहतात. शेतातच साधारण घर आहे. मोठा मुलगा रामकिसन पवार (वय ४२) हा मोठ्या आजाराने ग्रस्त आहे. त्यांना कुठलीही हालचाल करता येत नाही. औषधोपचाराचा खर्च खूपच मोठा आहे. त्यांना साधारण दीड एकर शेती आहे. दोन लहान मुले असून तेथील जि.प.शाळेत शिकत आहेत. आईला अर्धांगवायूचा झटका आला असून त्यामध्ये त्यांची वाचा गेली आहे. ही सर्व परिस्थिती खूपच बिकट आहे. त्यांची पत्नी दररोज रोजाने शेतात जावून घराचा व पतीचा औषध उपचाराचा खर्च भागवतात. बावी येथील भारत बाजीराव जाधव यांच्या मुलाने प्रकाश जाधव (वय ३६) यांनी आत्महत्या केली आहे. त्यांच्या मागे पत्नी व मुले आहेत. यांची ही आत्महत्या आर्थिक कारणावरून झाली आहे. सदर कुटूंबाची आर्थिक परिस्थिती ही साधारण स्वरूपाची आहे. आत्महत्या ग्रस्त शेतकरी कुटुंबाची ही प्रत्यक्ष वस्तुस्थिती आहे. या अहवालाचा स्विकार करावा, ही विनंती.

**रविंद्र कमलाकर कुलकर्णी**
**इतिहास विभाग**

**प्रा.डॉ.जयश्री कुलकर्णी**
**इतिहास विभाग**

तपस्वी पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, येवती संचलित

व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, उस्मानाबाद

**शैक्षणिक वर्ष २०१९-२०२०**

**प्रकल्प**

**''उस्मानाबाद तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाचे आर्थिक व सामाजिक सर्वेक्षण''**

## प्रत्यक्ष मुलाखत : एक अनुभव

आमच्या महाविद्यालयाचया वतीने उस्मानाबाद तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाचे आर्थिक व सामाजिक सर्वेक्षण करण्याचे ठरविले. समाजशास्त्र विभागातील शिक्षक प्रा.गोरे ए.आर. व प्रा.बाराते बी.टी. यांनी सांजा, वाघोली, सारोळा या तीन गावातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबाची प्रत्यक्ष भेट घेतली. या भेटीमधून आलेले प्रत्यक्ष अनुभव व तथ्य मांडणी करीत आहोत.

**१) मयत स्व.पाटील प्रकाश (सांजा)**

या कुटुंबाची जबाबदारी शांता प्रकाश पाटील वय ६० वर्षे यांच्याकडे आहे. या कुटुंबात एकुण सहा सदस्य आहेत. या कुटुंबाकडे ५,००,०००/- रुपयाचे कर्ज आहे. या कुटुंाबतील सर्व अपत्य १० ते १५ वयोगटामधील आहेत. त्यांच्या उत्पन्नाचा स्त्रोत शेती आहे. मयत व्यक्तीच्या नावे १.५ एकर जमीन आहे. वार्षिक उत्पन्न ८०,०००/- रुपये एवढेच आहे. घर माळवदाचे जुने आहे. मयताच्या पत्नीचे वय ३० वर्षे आहे. मयताची पत्नी व आई मानसिकदृष्ट्या खचली आहे. यांना शासकीय मदत १,००,०००/- प्राप्त झाली आहे.

**२) पाटील सुजित गणपती (वाघोली)**

या कुटुंबाची सर्व जबाबदारी गणपतराव विठ्ठल पाटील यांच्याकडे आहे. त्यां वय ७६ वर्षे आहे. या कुटुंबात ९ सदस्य आहेत. सर्व सभासद शिकलेले आहेत. घर साधरण पत्र्याचे आहे. मयत व्यक्तीचे वय ३७ वर्ष होते. कर्जबाजारीपणा हे आत्महत्याचे कारण आहे. बँकेचे कर्ज २,५०,०००/- रुपये आहे. शेती हे उत्पन्नाचे साधन आहे. ६ एकर जमीन आहे. वार्षिक उत्पन्न ६०,०००/- रुपये आहे. शासनाकडून १,००,०००/- रुपयांची मदत मिळाली आहे.

**३) कुदळे नवनाथ हरी (सारोळा)**

या कुटुंबाची जबाबदारी जीजाबाई नवनाथ कुदळे यांच्याकडे आहे. त्यांचे वय ६० वर्षे आहे. या कुटुंबात ६ सदस्य आहेत. शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. एक मुलगा उच्च शिक्षण घेऊन पुणे येथे नोकरी करीत आहे पण कुटुंबाची मदत करत नाही. लहान मुलाच्या शिक्षणासाठी कर्ज घेतले होते. जमीन ५ एकर आहे. घर ३ रुमचे पत्र्याचे आहे. या कुटुंबाची अत्यंत हालाखीची आर्थिक परिस्थिती आहे. या कुटुंबाला मदतीची गरज आहे. तरी सेवाभावी संस्थांनी पुढाकार घेऊन मदत केली पाहिजे.

अशा प्रकारे आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाचे आर्थिक व सामाजिक सवेक्षण अहवाल आहे.

**प्रा.गोरे ए.आर.**
**समाजशास्त्र विभाग**

Head
Department of Sociology
Venkatesh Mahajan Sr.College
Osmanabad

**प्रा.बाराते बी.टी.**
**समाजशास्त्र विभाग**

तपस्वी पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, येवती संचलित
व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, उस्मानाबाद

**शैक्षणिक वर्ष २०१९-२०२०**

**प्रकल्प**

## "उस्मानाबाद तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाचे आर्थिक व सामाजिक सर्वेक्षण"

## प्रत्यक्ष मुलाखत : एक अनुभव

आमच्या महाविद्यालयाच्या वतीने उस्मानाबाद तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटूंबाचे आर्थिक व सामाजिक सर्वेक्षण करण्याचे ठरविले असता म.फुले, डॉ.आंबेडकर विचारधारा विभागाचे प्राध्यापक श्री.आप्पासाहेब माळी यांचेकडे काजळा म्होतरवाडी व वरुडा या तीन गावातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटूंबाला प्रत्यक्ष भेटण्याची एक संधी मिळाली या भेटीमधून जे निरीक्षण केले. त्याची माहिती सादर करीत आहोत.

**१) मीराबाई कदम (काजळा)**

मीराबाई कदम यांनी आत्महत्या करण्याचे कारण म्हणजे त्यांच्यावर बँकेचे कर्ज होते व शेतामध्ये दोन-तीन वर्षापासून काहीही धान्य पिकत नव्हते. घरामध्ये मुल, सुना, नातवंडे असा मोठा परिवार होता. या सर्वांचा खर्च भागवणे अवघड होते. इतरात्र कुठे कामही मिळत नव्हते. यामुळे कंटाळून आत्महत्या केली.

**२) स्व.रेणुकादास कुलकर्णी (वरूडा)**

वरुडा येथील शेतकरी रेणुकादास कुलकर्णी यांनी कॅनरा बँकेचे व जिल्हा मध्यवर्ती बँकेचे कर्ज एकुण २,७०,०००/- एवढे होते. त्याचबरोबर मुलींचे लग्न झालेले शेताची नापिकी व मुलाच्या शिक्षणाचा खर्च यामुळे त्यांनी विषारी औषध पिऊन आत्महत्या केली.

**३) स्व.तानाजी भागुडे (म्होतरवाडी)**

म्होतरवाडी येथील शेतकरी तानाजी भगुडे यांनी बँकेचे कर्ज व मुलीच्या लग्नाला होणारा खर्च या गोष्टीचे त्यांनी सतत टेन्शन होते.त्यांना दोन मुली एक मुलगा आई असा परिवार आहे. या सर्वांना जगविणे खूप अवघड वाटत होते. त्याचबरोबर मोठ्या मुलीचे लग्न त्यांनी केले. त्यामुळे त्यांच्यावर कर्ज होते व दुसरी मुलगी लग्नाला आली आणि शेतात दुष्काळामुळे काही पिकत नाही. या कारणामुळे त्यांनी झाडाला

गळफास घेण्याचा प्रयत्न केला पण त्यांच्या मुलाने वाचविले व झाडावरून खाली पडले. त्यांच्या मणक्याचे ऑपरेशन झाले. त्यामध्ये त्यांच्यावर आणि कर्ज झाले. या तणावाखाली येऊन त्यांनी एक वर्षानंतर लगेच विषारी औषध पिऊन आत्महत्या केली.

या कुटुंबातील मोठ्या मुलीचे पती निधन पावले आहेत. त्यामुळे ती मुलगी व तिचे दोन लहान मुली या सर्व माहेरीच राहत आहेत व दुसऱ्या मुलीचे लग्न वडिलानंतर आईनेच केले. मुलगा इयत्ता ११ वीमध्ये शिकत आहे. घर अगदी साधे आहे. सध्या मुलाच्या शिक्षणाचा खर्च करणे त्यांना अवघड आहे. शेतीमधून पाऊस नसल्यामुळे काही उत्पन्न निघत नाही.

तरी या कुटुंबाला काही मदत देता आली तर खूप चांगले होईल.

**श्री.माळी ए.व्ही.**

**म.फुले, डॉ.आंबेडकर विचारधारा विभाग**

तपस्वी पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, येवती संचलित
व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, उस्मानाबाद
**शैक्षणिक वर्ष २०१९-२०२०**
**प्रकल्प**

## "उस्मानाबाद तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाचे आर्थिक व सामाजिक सर्वेक्षण"

## प्रत्यक्ष मुलाखत : एक अनुभव

दिनांक ८ सप्टेंबर २०१९ वार रविवार रोजी आम्ही उस्मानाबाद तालुक्यातील पाडोळी, राजूरी व सुंभा या तीन गावात भेटी साठी गेलो होतो. कुटुंबाचे आर्थिक व सामाजिक सर्वेक्षण करताना ज्या बाबी निदर्शनास आल्या त्या महत्वाच्या वाटतात.

सर्व प्रथम आमही राजूरी या गावात गेलो. या गावातील घोगरे दत्तात्रय लक्ष्मण वय ५० वर्षे यांनी फाशी घेऊन आत्महत्या केली. त्यांच्या कुटुंबातील पत्नी व तीन अपत्य अशी एकुण आत्महत्याग्रस्त व्यक्तीला धरून पाच सदस्य होते.मुले उच्चशिक्षण घेत आहेत. कुटुंबातील आर्थिक परिस्थिती जेमतेम होती. घरसुध्दा साधे पत्र्याचे असून शेती केवळ एक एकर आहे. घरातील त्यांचे बंधू असे सांगत होते की, मुलाच्या शिक्षणाचा खर्च वाढत होता. शेतीतून पुरेसे उत्पन्न प्राप्त होत नव्हते त्यामुळे कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बिघडत चालली होती. या सर्व परिस्थितीला कंटाळून दिनांक ४ एप्रिल २०१७ रोजी घोगरे दत्तात्रय लक्ष्मण यांनी फाशी घेऊन आपले जीवन संपवून टाकले.

त्यानंतर दुसरी आत्महत्या जी झालेली होती ते गाव होते सुंभा या गावातील दगडू लक्ष्मण बूर्ले वय ४५ यांनी सुध्दा फाशी घेवून आत्महत्या केली. या व्यक्तीच्या घरच्या सदस्यांनी असे सांगितले की, त्यांच्यावर

बँकेचे कर्ज ६० हजार रुपये व खाजगी सावकाराचे कर्ज ३ लाख रुपये होते. सलग तीन वर्षे शेती न पिकल्यामुळे दगडू यांनी आपले जीवन संपविले.

तिसरी आत्महत्या घडली ते ठिकाण होते पाडोळी, येथील पसारे अंकुश दत्तु वय ३० याने २-११-२०१८ ला आपले जीवन फाशी घेऊन संपवले होते. या कुटुंबाला १ लाख रुपये सरकारी मदत मिळाली. या कुटुंबावर बँकेचे ६०,००० रुपये व खाजगी सावकाराचे २.५ लाख रुपये कर्ज होते. सध्या सुध्दा या कुटुंबावर ५०,०००/- रुपये कर्ज होते. कमाईचे साधन सध्या सुध्दा या कुटुंबाचे मजुरी हेच आहे.

**प्रा.डॉ.प्रमोद बेरळीकर**

**अर्थशास्त्र विभाग**

**श्री.प्रवीण काशीद**

**अर्थशास्त्र विभाग**


तपस्वी पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, येवती संचलित

व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, उस्मानाबाद

# " उस्मानाबाद तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयांशी संवाद"

# निवडक क्षणचित्रे


( दि. ८ ते २२ सप्टेंबर २०१९)





ग. भा. अंजना प्रभाकर शिंदे व सौ. गोदावरी मोहन शिंदे (सांगवी)

सोबत डॉ. विनोदकुमार वायचळ व डॉ. संजय जोशी



सौ. दमयंती बबन क्षिरसागर व श्री. बबन विष्णू क्षिरसागर (नितळी)

सोबत डॉ. विनोदकुमार वायचळ व डॉ. संजय जोशी




गं. भा. आवडाबाई दादासाहेब तनमोर व श्री. सर्जेराव दादासाहेब तनमोर (भिकार सारोळा) सोबत डॉ. विनोदकुमार वायचळ व डॉ. संजय जोशी




गं. भा. शांता प्रकाश पाटील, श्री. राजपाल प्रकाश पाटील, पुष्कराज पाटील (सांजा) सोबत प्रा. अशोक गोरे व प्रा. बापू बाराते



सौ. वैशाली संतोष पाटील, गं. भा. रोहिणी सुजीत पाटील, कु. सानिका सुजीत पाटील, श्री. ऋतुराज सुजीत पाटील (वाघोली) सोबत प्रा. अशोक गोरे व प्रा. बापू बाराते



सौ. अस्मिता समाधान कुदळे (सारोळा) सोबत प्रा. अशोक गोरे व प्रा. बापू बाराते




श्री. बाळू लिंबराज डावकरे (दाने) व श्री. दिनेश लिंबराज डावकरे (दाने) (बेंबळी) सोबत प्रा. दिनकर रासवे व डॉ. महादेव हारगे



गं. भा. सुवर्णा सोमनाथ गाढवे व कुटूंबीय (धुत्ता) सोबत प्रा. दिनकर रासवे व डॉ. महादेव हारगे




श्री. सोमनाथ गेंदा बनसोडे (कनगरा) सोबत प्रा. दिनकर रासवे व डॉ. महादेव हारगे



गं. भा. सुवर्णा अंकुश पसारे (पाडोळी) सोबत डॉ. प्रमोद बेरळीकर व प्रा. प्रवीण काशिद



गं. भा. सुनिता दत्ता घोगरे व कुटूंबीय (राजुरी) सोबत डॉ. प्रमोद बेरळीकर व प्रा. प्रवीण काशिद




श्री. सुभाष दगडू बुर्ले (सुंभा) सोबत डॉ. प्रमोद बेरळीकर व प्रा. प्रवीण काशिद



श्री. हनुमंत लक्ष्मण कदम (काजळा) सोबत प्रा. आप्पासाहेब माळी




गं. भा. रोहिणी रेणुकादास कुलकर्णी, श्री. ओंकार रेणुकादास कुलकर्णी (वरूडा) सोबत प्रा. आप्पासाहेब माळी




गं. भा. केशरबाई तानाजी भागुरे (मोहोतरवाडी) सोबत प्रा. आप्पासाहेब माळी



श्री. भारत बाजीराव जाधव (बावी) सोबत प्रा. रवींद्र कुलकर्णी




श्री. रामकिसन वसंत पवार व कुटूंबीय (धारूर) सोबत प्रा. रवींद्र कुलकर्णी





गं. भा. लक्ष्मीबाई दादासाहेब पारवे व कुटूंबीय (बरमगांव बु.)

सोबत डॉ. प्रशांत चौधरी व डॉ. सहदेव रसाळ



गं. भा. मंगल संदिपान शिंदे, श्री. धनराज संदिपान शिंदे व सौ. अश्विनी धनराज शिंदे (भंडारी)



सोबत डॉ. प्रशांत चौधरी व डॉ. सहदेव रसाळ

समन्वयक
Head
Department Of Sociology
Venkatesh Mahajan Sr.College
Osmanabad

व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय
कार्यालय
उस्मानाबाद

PRINCIPAL
Venkatesh Mahajan Senior College,
Osmanabad 413501

तपस्वी पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट येवती संचलित

# व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, उस्मानाबाद

## “समाजशास्त्र विभाग”

## “उस्मानाबाद तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाचे आर्थिक व सामाजिक सर्वेक्षण”

### “प्रश्नावली”

१) आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंब प्रमुखाचे नाव :- ------------------------------------------------

कुटुंब प्रमुखाचे गाव :- ------------------------------------------------

कुटुंब प्रमुखाचे वय :- ------------------------------------------------

२) कुटुंबातील सदस्यांची माहिती :------------------------------------------------

| क्र. | सदस्याचे नाव | वय | शिक्षण |
|---|---|---|---|
| १. | | | |
| २. | | | |
| ३. | | | |
| ४. | | | |
| ५. | | | |
| ६. | | | |
| ७. | | | |
| ८. | | | |
| ९. | | | |
| १०. | | | |

३) कुटुंबाच्या उत्पन्नाचे स्त्रोत

१) ------------------------------------------------

२) ------------------------------------------------

३) ------------------------------------------------

४) कुटुंबाचे सरासरी वार्षिक उत्पन्न :- ------------------------------------------------

५) आत्महत्या केलेल्या मयत व्यक्तीचे नाव :----------------------------------------------------------------

आत्महत्या केलेल्या मयत व्यक्तीचे वय :- ----------------------------------------------------------------

आत्महत्येचा प्रकार :----------------------------------------------------------------

आत्महत्येचा दिनांक :----------------------------------------------------------------

६) आत्महत्येची कारणे :-

१) ----------------------------------------------------------------

२) ----------------------------------------------------------------

३) ----------------------------------------------------------------

७) आत्महत्या करतेवेळी कर्जाचे स्वरुप :-

१) बँकेचे कर्ज रक्कम रुपये :----------------------------------------------------------------

२) खाजगी सावकाराचे कर्ज :----------------------------------------------------------------

८) आत्महत्येनंतर मिळालेली मदत :-

१) शासकीय मदत :----------------------------------------------------------------

२) अन्य मदत :----------------------------------------------------------------

९) आत्महत्याग्रस्त कुटुंबाची सद्यस्थिती :-

१) वार्षिक सरासरी उत्पन्न :----------------------------------------------------------------

२) कमाईचे साधन :----------------------------------------------------------------

३) अवलंबित व्यक्तींची संख्या :----------------------------------------------------------------

४) शेती असल्यास किती :----------------------------------------------------------------

५) घरात कोणी नोकरीस आहे का ? ----------------------------------------------------------------

६) घराचे स्वरुप :----------------------------------------------------------------

७) सध्या कर्ज आहे का ? किती ? :----------------------------------------------------------------

१०) अन्य आवश्यक माहिती :-

**प्रा. अशोक रा. गोरे**
**समाजशास्त्र विभाग प्रमुख**
**व्यं. म. महाविद्यालय, उस्मानाबाद**